Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837

एप्रिल २०२४

खंड १७, अंक ४

किंमत रु. २/-

वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड यांचे मासिक

# वेल्थवाईज®


Wiseinvest®
AMFI-registered Mutual Fund Distributor

## आतील बाजूस


| आतील बाजूस | पान क्र. |
|---|---|
| इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी सातत्यपूर्णता ही गुरुकिल्ली आहे | २ |
| निवडक फंडचा परिणाम | ३ |
| नेहमीच्या वाटेवरून डोळे झाकून चालू नका | ४ |


## "वाईजइन्व्हेस्ट"

"वेल्थवाईज" हे वाईजइन्व्हेस्ट चे मासिक प्रकाशन आहे. वाईजइन्व्हेस्ट एक AMFI रजिस्टर्ड म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर आहे. आमचे सीईओ श्री. हेमंत रुस्तगी हे सुप्रसिध्द पर्सनल फायनान्स तज्ञ आहेत. त्यांच्याकडे म्युच्युअल फंड उद्योग क्षेत्रातला 30 वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. ते नियमितपणे मुख्य राष्ट्रीय दैनिकांतून आणि व्यापारविषयक मासिकांतून लेख लिहितात त्याचप्रमाणे गुंतवणुकीशी संबंधित दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांतून पर्सनल फायनान्स तज्ञ म्हणून उपस्थित असतात. गेल्या 20 वर्षांत आमच्या हजारो ग्राहकांना त्यांच्या पोर्टफोलिओचा म्युच्युअल फंडस् हा मुख्य आधार बनवलेला आहे. तुमच्या सध्याच्या तसेच नवीन गुंतवणुकीसाठी तुम्हाला सुध्दा आमच्या तज्ञ मार्गदर्शनाचा लाभ होऊ शकतो. तुम्हाला फक्त आमच्या कोणत्याही शाखेला फोन करणे अथवा information@wiseinvest.co.in या संकेतस्थळावर तुमचे तपशील ई–मेल करणे एवढेच करायचे आहे.



प्रिय गुंतवणूकदार,

आर्थिक वर्ष २३-२४ च्या शेवटी भारताच्या स्टॉक मार्केटचा शेवट मजबूत स्थितीत झाला, ज्यात निफ्टीने जवळपास २८.६%ची उसळी मारली, ज्यामुळे ते जगातील सर्वात चांगली कामगिरी करणाऱ्या मार्केटपैकी एक ठरले. ह्या कालावधीत निफ्टीची कामगिरी गेल्या १० वर्षांमधील सर्वोत्कृष्ट कामगिरी होती. ह्या कालावधीत मिड आणि स्मॉल कॅप निर्देशांकांनी सर्वोत्तम कामगिरी केली. मनोरंजक गोष्ट म्हणजे, एक पंचमांश निफ्टी ५०० स्टॉक्स आर्थिक वर्ष २०२४मध्ये दुप्पट झाले. एफपीआयचा ओघ मोठ्या प्रमाणावर येणे, वस्तूंच्या किमती कमी होणे, कर्जांमध्ये वाढ झाल्याने, बँकांचे मजबूत ताळेबंद आणि कॅपेक्सने पुन्हा घेतलेली उसळी यांमुळे बाजारपेठेचा दीर्घकालीन दृष्टिक्षेप बदलला नाही.

मार्च महिन्यात वस्तू व सेवा करामुळे (जीएसटी) गोळा झालेली ढोबळ रक्कम १.७८ लाख कोटी रुपये एवढी दुसऱ्या क्रमांकाच्या पातळीपर्यंत वाढली. ही वर्षागणिकची ११.५% वाढ आहे आणि ती मुख्यत: देशांतर्गत व्यवहारांमुळे वाढलेल्या जीएसटीच्या रकमेमुळे झाली. संपूर्ण वर्षात गोळा झालेली जीएसटीची रक्कम १० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली, ज्यातून आधीच्या आर्थिक वर्षापेक्षा ११.७% वाढ झाल्याचे दिसते.

भारताच्या आठ पायाभूत सुविधांच्या (कोअर) क्षेत्राने फेब्रुवारीमध्ये ६.७% वृद्धी नोंदवली, जी जानेवारी महिन्यापेक्षा ४.१% जास्त होती आणि गेल्या तीन महिन्यांतील सर्वाधिक होती. कोअर सेक्टर्स ज्यांमध्ये कोळसा, कच्चे तेल, पोलाद, सिमेंट, विद्युतनिर्मिती, खते, रिफायनरी उत्पादने आणि नैसर्गिक वायू यांचा समावेश होतो.

एप्रिल-फेब्रुवारी या कालावधीत भारताची आर्थिक तूट ही संपूर्ण वर्षाच्या १७.३४ लाख कोटी रुपये म्हणजेच जीडीपीच्या ५.८% एवढ्या सुधारित लक्ष्यापेक्षा १५.०१ लाख कोटी रुपये किंवा ८६.५ टक्के एवढी राहिली. केंद्र सरकारला करापासून मिळालेला ढोबळ महसूल आर्थिक वर्ष २०२४च्या ११ महिन्यांमध्ये वर्षागणिक १३.४% एवढा भक्कमपणे वाढला. ह्याला वर्षागणिक प्राप्त झालेल्या आयकरातील २५.८% आणि कॉर्पोरेट करातील १७.३% वाढीमुळे मदत मिळाली. तथापि, केंद्र सरकारच्या निव्वळ कराच्या गोळा झालेल्या एकूण रकमेत फक्त ६.८% एवढीच वाढ आर्थिक वर्ष २०२४च्या ११ महिन्यांमध्ये वर्षागणिक झाली, जी गेली चार वर्षांतील सर्वात कमी वाढ आहे व त्याचे कारण होते राज्यांकडे केलेल्या हस्तांतरणात झालेली मोठी वाढ.

वेगवेगळ्या लघु बचत योजनांवरील व्याजाचा दर १ एप्रिल २०२४ पासून सुरू होणाऱ्या तिमाहीमध्ये बदलणार नाही. त्यानुसार, सुकन्या समृद्धी योजनेवर ८.२ टक्के, तर तीन वर्षांच्या मुदतठेवीवरील व्याजदर ७.१% राहील. पीपीएफ आणि पोस्ट ऑफिस बचतठेवींवरील व्याजाचा दर हा अनुक्रमे ७.१% आणि ४% एवढा ठेवण्यात आलेला आहे.

सस्नेह,

हेमंत रुस्तगी
संपादक

Address to be affixed here

If undelivered, please return to:

**Wiseinvest Pvt. Ltd.**
602, 6th Floor, Sri Krishna Complex,
Opposite Laxmi Industrial Estate,
New Link Road, Andheri (W),
Mumbai 400 053.
Tel : 6828 8947

## मार्च २०२४ मधील शेअर बाजारातील परिणाम

| निर्देशांक | २९ फेब्रुवारी २०२४ | २८ मार्च २०२४ | बदल (%) |
|---|---|---|---|
| सेन्सेक्स | ७२,५००.३० | ७३,६५१.३५ | १.५९ |
| मिडकॅप | ३९,३४६.९८ | ३९,३२२.१२ | -०.०६ |
| स्मॉल कॅप | ४५,२२५.१० | ४३,१६६.३४ | -४.५५ |
| बठ एस ई-१०० | २२,९२१.२७ | २३,२९४.०४ | १.६३ |
| बठ एस ई-२०० | ९,९५५.३८ | १०,०९९.५८ | १.४५ |
| बठ एस ई-५०० | ३१,७७७.०२ | ३२,०४३.२० | ०.८४ |



# इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी सातत्यपूर्णता ही गुरुकिल्ली आहे

जे गुंतवणूकदार दीर्घ कालावधीमध्ये तेजीचा सामना करून पुढे जाऊ इच्छितात त्यांच्यासाठी इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्याचे महत्त्व सिद्ध झालेले आहे. तथापि, ह्या आश्चर्यकारक असेट क्लासच्या संभाव्य क्षमतेपासून प्रत्येक गुंतवणूकदाराला खरा फायदा होतोच असे नाही. त्याचे कारण असे आहे की, त्यांच्या ठरवलेल्या कालक्षितिजामध्ये ते त्यांच्या गुंतवणूक प्रक्रियेत सातत्य राखीत नाहीत.

जेव्हा स्टॉक मार्केट अस्थिर असते तेव्हा अनेक गुंतवणूकदार हेलकावे खातात आणि गुंतवणुकीविषयी घाईघाईने चुकीचे निर्णय घेतात. त्यांची मन:स्थिती निर्देशांकाच्या पातळीसोबत कशी बदलते हे पाहणे विस्मयकारक असते. बाजारपेठा चांगली कामगिरी करीत असताना मंदीच्या काळात गुंतवणूकदार इक्विटीमध्ये गुंतवणूक करणे सोडून देतात यात आश्चर्य ते कसले! या दोन्ही स्थितींमध्ये त्यांनी हा निर्णय एकतर घाबरून किंवा लोभामुळे घेतलेला असतो, त्यांच्या गुंतवणुकीच्या धोरणामुळे नव्हे! याचे परिणाम नेहमीच निराशाजनक असतात हे वेगळे सांगण्याची गरजच नाही.

त्यानंतर, असे काही गुंतवणूकदार असतात, ज्यांना असे वाटत असते की, ''बाजारपेठेची वेळ साधणे'' हे उत्तम धोरण असते. आपल्यापैकी बहुतेकांनी ''आता खरेदी करा आणि वाढलेल्या किमतीला विका'' हा वाक्प्रचार ऐकलेला असतो; विक्री करण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी योग्य वेळेचे भाकीत करणे अत्यंत कठीण असते. जसे बऱ्याच गुंतवणूकदारांच्या बाबतीत असे घडते की त्यांना स्टॉक मार्केट बरेच रहस्यमय वाटत असते आणि बाजारपेठेच्या वेगवेगळ्या स्थितींमध्ये काय करावे याबद्दल त्यांना खात्री नसते. ''शुअर-शॉट'' असे गुंतवणुकीचे कोणतेही धोरण नसले तरी गुंतवणूक प्रक्रिया चालू ठेवणे अगदी परिणामकारक ठरू शकते, कारण त्यामुळे बाजारातील बहुतेक अपूर्ण स्थितींची काळजी घेतली जाते.

गुंतवणूक एकरकमी करावी की एसआयपीच्या माध्यमातून याविषयी अनेक गुंतवणूकदार द्विधा मन:स्थितीत असतात. अल्पकाळात बाजारपेठेतील घडामोडींचे भाकीत करणे कठीण असल्यामुळे एकरकमी गुंतवणूक आणि एसआयपी यांच्या एकत्रीकरणाने अधिक चांगल परिणाम प्राप्त होऊ शकतात. आपल्या देशात म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारांची संख्या मोठी आहे, पण ते एसआयपीमध्ये गुंतवणूक करीत नाहीत. त्यानंतर असेही गुंतवणूकदार असतात जे पद्धतशीरपणे गुंतवणूक करण्यास कटिबद्ध असतात, पण त्यांच्या वाढत्या उत्पन्नाबरोबर त्यांच्या गुंतवणुकीत वाढ करण्यात अयशस्वी होतात. एसआयपीच्या रकमेमध्ये दरवर्षी वाढ केल्याने दीर्घ कालक्षितिजामध्ये गुंतवणूकदाराकडे जो निधी जमा होतो, त्यात मोठा फरक पडतो.

असेट अलोकेशन हे आणखी एक असे धोरण आहे, ज्यामुळे स्टॉक मार्केटमधील टोकाच्या घडामोडींचा विपरीत परिणाम कमी केला जातो. असेट अलोकेशन स्ट्रॅटेजीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असे आहे की, वेगवेगळे असेट क्लासेस कसे वर्तन करतात हेच फक्त ती विचारात घेते असे नाही, तर तुम्ही एक गुंतवणूकदार म्हणून तुमचे वर्तन कसे असू शकते तेही विचारात घेते. असेट अलोकेशन स्ट्रॅटेजीमुळे तुम्हाला असा पोर्टफोलिओ तयार करता येतो, ज्याची तुमच्या गुंतवणुकीच्या प्रवृत्तीशी मिळतेजुळते घेण्याची क्षमता असते.

यामुळे गुंतवणूकदाराला परताव्याच्या बाबतीत काय अपेक्षा ठेवता येऊ शकते आणि तो प्राप्त करण्यासाठी किती जोखीम घ्यावरी लागेल हे ठरविण्यासाठीही मदत होते. असेट अलोकेशन नसेल, तर चढत्या बाजारपेठेत आपण आक्रमकणे इक्विटीमध्ये गुंतवणूक करून बसू शकतो आणि बाजारपेठ जेव्हा घसरते तेव्हा पूर्णपणे खाली येतो. दुर्दैवाने अनेक गुंतवणूकदार हेच करीत असतात आणि बाजारपेठ घसरली की तळाशी ''शरणागती'' पत्करतात. नेमस्तपणे गुंतवणूक करून त्याला चिकटून राहण्यापेक्षा ह्याचे परिणाम खूपच वाईट असू शकतात. म्हणून आपल्याला काय हवे आहे यापेक्षा आपल्याला कशाची गरज आहे यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

म्युच्युअल फंड्स हे ज्यांना गुंतवणुकीसाठी ज्यांकडे साधने आणि थेट अनुभव नसेल त्यांच्यासाठी इक्विटीज्‌मध्ये गुंतवणूक करणे हा आदर्श मार्ग असू शकतो. म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करण्याच्या शिस्तबद्ध दृष्टिकोनामुळे गुंतवणूक धोरणातील सट्टेबाजीचा घटक दूर केला जात असला, तरी व्यावसायिक फंड मॅनेजर्सच्या प्रावीण्यामुळे कालांतराने गुंतवणूक स्थिर कामगिरी करण्यास आणि बहुतेक तात्पुरते अडथळे दूर करण्यास मदत होते.

सध्या ज्या प्रकारचे वातावरण आहे अशा कठीण वातावरणात गुंतवणूक करणे हे अगदी आव्हानात्मक असू शकते यात काही शंका नाही. म्हणून जोखीम सोसण्याची योग्य पातळी निश्चित करून ती राखणे आणि ठरवलेल्या कालक्षितिजाशी कटिबद्ध राहण्याने गुंतवणुकीत यशस्वी होण्याची खातरजमा होऊ शकते.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युल फंड, शेअर बजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

## आमच्या सन्माननीय वाचकांसाठी सुचना

अधिकाधिक गुंतवणूकदारांना त्यांच्या गुंतवणुकीतून जास्तीतजास्त परतावा मिळावा यासाठी आमच्या प्रामाणिक प्रयत्नांचा एक भाग म्हणून तुमच्यापैकी काही जणांना 'वेल्थवाईज' मोफत पाठविण्यात येत आहे. आम्हाला अशी प्रामाणिक अपेक्षा आहे की, तुम्हाला वेल्थवाईज मधला मजकूर आवडेल आणि कोणत्या ना कोणत्या मार्गाने तुम्हाला त्यापासून फायदा होईल. परंतु तुम्हाला जर नियमितपणे 'वेल्थवाईज' नको असेल, तर कृपया आम्हाला information@wiseinvest.co.in वर ईमेल पाठवून तसे कळवावे. तुम्ही आम्हाला पेज ४ वर उल्लेख केलेल्या आमच्या कॉर्पोरेट कार्यालयाच्या पत्त्यावरही लिहून कळवू शकता.

# निवडक फंडचा परिणाम

## मार्च २८, २०२४ रोजी असलेल्या नोंदी

## इक्विटी फंडस्

### लार्ज कॅप, लार्ज & मिडकॅप, मल्टी कॅप

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ABSL Flexi Cap Fund | Aug-98 | 14.89 | 37.32 | 14.77 | 16.90 | 15.40 | 13.24 | 16.67 | 17.98 |
| ABSL Frontline Equity Fund | Aug-02 | 14.89 | 33.85 | 15.88 | 17.28 | 14.84 | 12.95 | 14.57 | 17.28 |
| Axis Focused 25 Fund | Jun-12 | 16.52 | 34.63 | 6.74 | 9.44 | 12.63 | 12.78 | 14.53 | - |
| Axis Growth Opportunities Fund | Oct-18 | 19.22 | 47.97 | 16.04 | 20.33 | 21.13 | - | - | - |
| Bandhan Focused Equity Fund | Mar-06 | 18.65 | 39.84 | 15.47 | 15.74 | 14.38 | 13.02 | 12.82 | 13.31 |
| Canara Robeco Flexi Cap Fund | Sep-03 | 16.16 | 33.72 | 14.37 | 16.48 | 16.51 | 15.67 | 15.25 | 18.17 |
| HDFC Flexi Cap Fund | Jan-95 | 20.26 | 43.18 | 26.09 | 26.33 | 18.70 | 16.74 | 17.07 | 19.65 |
| HDFC Large and Mid Cap Fund | Feb-94 | 17.92 | 49.82 | 24.69 | 25.37 | 19.99 | 16.72 | 14.64 | 16.01 |
| HDFC Top 100 Fund | Sep-96 | 18.01 | 39.36 | 21.71 | 21.42 | 15.35 | 14.35 | 15.01 | 17.40 |
| ICICI Prudential Bluechip Fund | May-08 | 21.29 | 42.38 | 21.15 | 21.53 | 17.92 | 15.85 | 16.09 | 18.53 |
| ICICI Prudential Large & Mid Cap Fund | Jul-98 | 21.37 | 46.02 | 24.85 | 26.59 | 20.63 | 16.06 | 16.35 | 17.59 |
| Invesco India Contra Fund | Apr-07 | 18.22 | 42.61 | 20.09 | 19.95 | 17.39 | 16.23 | 18.60 | 19.75 |
| Kotak Bluechip Fund | Dec-98 | 15.35 | 32.29 | 15.50 | 16.11 | 15.95 | 13.99 | 14.94 | 15.66 |
| Kotak Equity Opportunities Fund | Sep-04 | 16.58 | 40.91 | 20.92 | 20.63 | 18.84 | 15.91 | 17.87 | 18.52 |
| Kotak Flexicap Fund | Sep-09 | 15.46 | 34.75 | 17.29 | 16.72 | 15.02 | 13.90 | 16.85 | - |
| Kotak Multicap Fund | Sep-21 | 24.46 | 61.46 | 30.50 | - | - | - | - | - |
| Mirae Asset Large & Midcap Fund | Jul-10 | 14.15 | 39.32 | 16.47 | 17.99 | 19.31 | 17.16 | 22.34 | - |
| Motilal Oswal Large and Midcap Fund | Oct-19 | 20.99 | 51.48 | 27.73 | 24.27 | - | - | - | - |
| Nippon India Large Cap Fund | Aug-07 | 18.81 | 44.82 | 24.29 | 24.55 | 17.15 | 16.00 | 16.98 | 17.61 |
| Nippon India Multi Cap Fund | Mar-05 | 16.44 | 50.18 | 27.22 | 29.57 | 19.69 | 17.35 | 17.24 | 21.29 |
| Parag Parikh Flexi Cap Fund | May-13 | 18.70 | 40.07 | 18.42 | 22.23 | 22.69 | 19.83 | 19.40 | - |
| PGIM India Flexi Cap Fund | Mar-15 | 12.02 | 26.95 | 10.24 | 15.34 | 18.49 | 14.98 | - | - |
| SBI Focused Equity Fund | Oct-04 | 11.52 | 34.40 | 11.98 | 16.11 | 15.81 | 15.42 | 17.29 | 22.58 |
| SBI Large & Midcap Fund | Feb-93 | 13.13 | 33.65 | 18.54 | 21.30 | 18.26 | 15.80 | 17.39 | 18.50 |
| UTI Flexi Cap Fund | May-92 | 5.57 | 22.94 | 5.15 | 8.44 | 13.45 | 13.07 | 14.19 | 16.77 |

### मिडकॅप आणि स्मॉल कॅप

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Axis Midcap Fund | Feb-11 | 15.67 | 41.33 | 16.21 | 18.56 | 20.09 | 18.45 | 19.54 | - |
| HDFC Mid-Cap Opportunities Fund | Jun-07 | 18.79 | 57.23 | 31.53 | 28.85 | 22.73 | 17.82 | 21.43 | 24.47 |
| Kotak Emerging Equity Fund | Mar-07 | 11.97 | 37.98 | 19.87 | 21.38 | 21.37 | 16.54 | 21.99 | 21.55 |
| Motilal Oswal Midcap Fund | Feb-14 | 26.54 | 60.37 | 32.92 | 34.67 | 25.58 | 18.44 | 22.13 | - |
| PGIM India Midcap Opportunities | Dec-13 | 11.01 | 29.06 | 12.82 | 19.86 | 24.02 | 16.74 | 17.78 | - |
| UTI Mid Cap Fund | Apr-04 | 10.24 | 40.76 | 17.80 | 19.39 | 19.93 | 14.85 | 18.80 | 22.12 |
| HDFC Small Cap Fund | Apr-08 | 12.13 | 47.74 | 28.81 | 30.64 | 21.38 | 19.61 | 20.60 | 21.73 |
| Kotak Small Cap Fund | Feb-05 | 9.43 | 38.38 | 15.43 | 22.06 | 24.70 | 17.68 | 21.55 | 22.22 |
| Nippon India Small Cap Fund | Sep-10 | 15.16 | 55.34 | 28.80 | 33.73 | 28.52 | 22.27 | 26.54 | - |
| SBI Small Cap Fund | Sep-09 | 10.42 | 36.50 | 20.47 | 23.02 | 23.36 | 20.24 | 25.63 | - |
| Bandhan Small Cap Fund | Feb-20 | 21.76 | 69.54 | 26.84 | 28.58 | - | - | - | - |

### सांप्रदायिक / विषयगत आणि कर बचत

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| UTI Flexi Cap Fund | May-92 | 5.57 | 22.94 | 5.15 | 8.44 | 13.45 | 13.07 | 14.19 | 16.77 |
| Nippon India Banking & Financial | May-03 | 10.05 | 33.86 | 20.42 | 20.90 | 12.41 | 12.49 | 15.85 | 19.37 |
| ICICI Prudential Pharma Healthcare | Jul-18 | 23.92 | 62.02 | 23.92 | 20.33 | 24.41 | - | - | - |
| Nippon India Pharma Fund | Jun-04 | 21.70 | 58.52 | 21.65 | 19.73 | 23.11 | 17.93 | 17.22 | 23.01 |
| SBI Healthcare Opportunities Fund | Jul-99 | 22.20 | 57.97 | 24.53 | 20.71 | 23.47 | 13.93 | 15.81 | 21.90 |
| Kotak Pioneer Fund | Oct-19 | 20.85 | 45.39 | 18.96 | 18.69 | - | - | - | - |
| Axis ELSS Tax Saver Fund | Dec-09 | 17.59 | 39.20 | 11.17 | 11.73 | 14.13 | 13.68 | 16.02 | - |
| Bandhan ELSS Tax Saver Fund | Dec-08 | 15.01 | 39.26 | 18.48 | 22.58 | 19.32 | 16.93 | 18.12 | 18.86 |
| Kotak ELSS Tax Saver | Nov-05 | 16.47 | 37.59 | 18.69 | 19.91 | 18.31 | 15.35 | 17.67 | 17.44 |
| Mirae Asset ELSS Tax Saver Fund | Dec-15 | 13.76 | 35.15 | 15.60 | 17.14 | 18.35 | 17.21 | - | - |

## हायब्रिड - आरबीट्राज

| Funds | Launch | 3 Mth* | 6 Mth* | 1 Year* | 2 year** | 3 Year** | 5 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Bandhan Arbitrage Fund | Dec-06 | 2.01 | 3.65 | 7.47 | 6.23 | 5.34 | 5.04 |
| ICICI Prudential Equity Arbitrage Fund | Dec-06 | 2.03 | 3.64 | 7.52 | 6.30 | 5.48 | 5.22 |
| Kotak Equity Arbitrage Fund | Sep-05 | 2.14 | 3.83 | 7.83 | 6.58 | 5.71 | 5.39 |

## हायब्रिड

| Fund | Launch | 6 Mth* | 1 Year* | 2 Year** | 3 Year** | 5 Year** | 7 Year** | 10 Year** | 15 Year** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ABSL Equity Hybrid '95 Fund | Feb-95 | 11.92 | 28.80 | 9.86 | 13.00 | 11.57 | 9.82 | 12.84 | 15.27 |
| Canara Robeco Equity Hybrid | Feb-93 | 12.81 | 27.34 | 13.02 | 13.81 | 14.34 | 13.11 | 14.79 | 16.44 |
| DSP Equity & Bond Fund | May-99 | 8.78 | 28.46 | 12.99 | 12.92 | 13.95 | 12.06 | 14.58 | 14.95 |
| ICICI Prudential Equity & Debt | Nov-99 | 19.24 | 41.11 | 22.17 | 25.73 | 20.18 | 16.71 | 17.67 | 18.50 |
| Kotak Equity Hybrid Fund | Nov-99 | 11.43 | 26.79 | 14.18 | 15.28 | 16.12 | 12.77 | 13.41 | 14.40 |
| SBI Equity Hybrid Fund | Dec-95 | 12.00 | 27.31 | 11.37 | 13.50 | 13.44 | 12.72 | 14.33 | 15.58 |
| ABSL Bal. Advantage Fund | Apr-00 | 9.34 | 21.71 | 12.15 | 11.58 | 11.42 | - | - | - |
| Bandhan Bal. Advantage Fund | Oct-14 | 8.58 | 21.04 | 9.23 | 9.40 | 9.99 | - | - | - |
| ICICI Prudential Bal. Advantage | Dec-06 | 11.62 | 22.70 | 14.08 | 13.38 | 12.77 | - | - | - |
| Kotak Bal. Advantage Fund | Aug-18 | 9.21 | 19.42 | 11.44 | 10.73 | 11.47 | - | - | - |
| Nippon India Bal. Advantage | Nov-04 | 11.88 | 24.20 | 13.60 | 12.46 | 11.32 | - | - | - |
| Bandhan Equity Savings Fund | Jun-08 | 4.97 | 11.66 | 7.16 | 7.29 | 7.35 | - | - | - |
| Kotak Equity Savings Fund | Oct-14 | 10.16 | 19.79 | 12.37 | 11.86 | 10.57 | - | - | - |

* पूर्ण मोबदला - ** वार्षिक मोबदला. योजनेची पूर्वीची कामगिरी तिच्या भविष्यातील कामगिरीची निदर्शक नाही.

### मार्च २०२४ मध्ये इक्विटी व इक्विटी ओरियंटेड फंडने घोषित केलेला निवडक फंडचा नफ्याचा हिस्सा

| Scheme name | Date | Dividend declared in ₹ Per unit |
|---|---|---|
| Nippon India ELSS Tax Saver Fund - Annual | 07-03-2024 | 1.50 |
| Nippon India ELSS Tax Saver Fund | 07-03-2024 | 2.50 |
| Nippon India Multicap Fund | 07-03-2024 | 5.00 |
| ICICI Prudential ELSS Tax Saver Fund | 11-03-2024 | 0.70 |
| ICICI Prudential Dividend Yield Equity Fund | 11-03-2024 | 2.20 |
| ICICI Prudential ESG Exclusionary Strategy Fund | 14-03-2024 | 1.50 |
| ICICI Prudential Business Cycle Fund | 14-03-2024 | 1.50 |
| ICICI Prudential Manufacturing Fund | 14-03-2024 | 2.00 |
| ICICI Prudential India Opportunities Fund | 14-03-2024 | 2.10 |
| Nippon India Large Cap Fund | 14-03-2024 | 2.50 |
| ICICI Prudential Value Discovery Fund | 14-03-2024 | 4.00 |
| Motilal Oswal Focused Fund | 19-03-2024 | 1.39 |
| Motilal Oswal Large and Midcap Fund | 19-03-2024 | 1.46 |
| Motilal Oswal Midcap Fund | 19-03-2024 | 1.60 |
| Motilal Oswal ELSS Tax Saver Fund | 19-03-2024 | 1.82 |
| Motilal Oswal Flexi Cap Fund | 19-03-2024 | 2.09 |
| Axis Equity Hybrid Fund | 21-03-2024 | 0.93 |
| Axis Midcap Fund | 21-03-2024 | 3.10 |
| Axis Small Cap Fund | 21-03-2024 | 3.51 |
| Mirae Asset Aggressive Hybrid Fund | 22-03-2024 | 1.40 |
| Invesco India ESG Equity Fund | 22-03-2024 | 1.60 |
| Mirae Asset Healthcare Fund | 22-03-2024 | 1.85 |
| Mirae Asset Midcap Fund | 22-03-2024 | 2.00 |
| Mirae Asset Large Cap Fund | 22-03-2024 | 2.30 |
| Aditya Birla Sun Life Equity Hybrid 95 Fund | 22-03-2024 | 2.95 |
| Bandhan Hybrid Equity Fund | 27-03-2024 | 0.26 |
| ICICI Prudential Equity & Debt Fund - Half Yearly | 27-03-2024 | 1.15 |
| Bandhan Focused Equity Fund | 27-03-2024 | 1.33 |
| Bandhan Large Cap Fund | 27-03-2024 | 1.61 |
| Bandhan Core Equity Fund | 27-03-2024 | 1.93 |
| Bandhan Small Cap Fund | 27-03-2024 | 2.07 |
| Bandhan ELSS Tax saver Fund | 27-03-2024 | 2.46 |
| Invesco India ELSS Tax Saver Fund | 27-03-2024 | 2.60 |
| Bandhan Sterling Value Fund | 27-03-2024 | 2.90 |
| Bandhan Flexi Cap Fund | 27-03-2024 | 3.48 |

तुमच्या पोर्टफोलियोमध्ये या यादीत असणाऱ्या तुमच्या फंडसाठी तुम्हाला डिव्हिडन्ड (नफ्याचा हिस्सा) मिळाला आहे का ते बघा. जर तुमच्याकडे कोणतीही पोर्टफोलिओ नोंद नसेल तर वाईजइन्व्हेस्ट तुमच्यासाठी ते कोणत्याही मोबदल्याशिवाय करुन देतील. एकदा आमच्याकडे तपशिल आला की आम्ही तुम्हाला दर महिन्याला नोंदी पाठवू. या मोफत सेवेचा लाभ घेण्यासाठी आमच्या मुख्य कार्यालयाशी किंवा इतर कोणत्याही शाखेशी संपर्क साधा.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युअल फंड, शेअर बाजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कॅपिटलमार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर आणि प्रभावांवर एन ए व्हि (NAV) चे वर किंवा खाली जाणे अवलंबून असते.

Registered - R.N.I. No.: MAHMAR/2008/26837
Date of publication: 8th of every month.

# नेहमीच्या वाटेवरून डोळे झाकून चालू नका

तुम्हाला तुमच्या गुंतवणुकीच्या मार्ग रुळावर ठेवण्यासाठी मदत करणाऱ्या महत्त्वाच्या घटकांपैकी एक घटक म्हणजे योजना बनविणे आणि तिची अंमलबजावणी करण्यासाठी धोरण आखणे. त्याखेरीज, तुमच्या गुंतवणूक प्रक्रियेच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर तुम्हाला मदत करण्यासाठी काही नेहमीच्या मार्गदर्शक पद्धती असतात. परंतु, त्यांच्यापैकी सगळ्यांचाच डोळे झाकून अवलंब करायचा नसतो. तुमच्या गरजांसाठी कोणत्या योग्य आहेत आणि कोणत्या नाहीत हे समजून घेणे महत्त्वाचे असते. येथे काही नेहमीच्या मार्गदर्शक पद्धती (thumb rule) देत आहोत:

## ७२चा नियम

हा नियम तुम्हाला विशिष्ट दराने तुमचे पैसे दुप्पट होण्यासाठी लागणाऱ्या वर्षांची संख्या सांगतो. उदाहरणार्थ, जर तुम्हाला हे जाणून घ्यायचे असेल की, ८% दराने तुमचे पैसे दुप्पट होण्यासाठी किती कालावधी लागेल, तर ७२ला ८ने भागा - त्याचे उत्तर असेल ९ वर्षे. हे दिसून येते की, नियम ७२ हे तुमची संपत्ती कशी वाढत जाईल हे जाणून घेण्याचे सर्वात मोठे साधन आहे. सोप्या शब्दात सांगायचे झाले, तर यामुळे गुंतवणुकीच्या कोणत्या पर्यायांमध्ये गुंतवणूक करावी आणि मुलांचे शिक्षण आणि तुमच्या स्वत:च्या सेवानिवृत्तीच्या योजनेसारखी दीर्घकालीन उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी किती गुंतवणूक करावी यामध्ये मदत होते. ह्या परताव्यांची विपरीत बाजू अशी आहे की, हे परतावे म्हणजे फक्त अंदाज असतो आणि तुमच्या असेट ॲलोकेशननुसार आणि तुम्ही तुमच्या पोटफोलिओवर कशी देखरेख करता त्यानुसार हे परतावे वेगवेगळे असू शकतात.

## ७०चा नियम

हा नियम तुम्हाला हे सांगतो की, तुमच्या गुंतवणुकीचे मूल्य सध्याच्या मूल्याच्या किती वेगाने अर्ध्यावर येईल. उदाहरणार्थ, तुम्ही जर ७०ला तेजीच्या ७% दराने भागले, तर तुमच्या पैशाचे मूल्य १० वर्षांमध्ये निम्मे होईल. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, शिक्षणाच्या तेजीचा दर १०% असेल आणि सध्याच्या शिक्षणाचा खर्च ५० लाख रुपये असेल, तर तो ७ वर्षांमध्ये वाढून १ कोटी रुपये होईल. भविष्यातील तुमच्या क्रयशक्तीचा अंदाज वर्तविण्यासाठी हा उपयुक्त नियम आहे आणि म्हणून दीर्घकालीन उद्दिष्टांचे नियोजन करताना तो महत्त्वाचा घटक असू शकतो.

## आर्थिक स्वातंत्र्यासाठी ४%चा नियम

ह्या नियमात हे स्पष्ट करून सांगितलेले असते की, तुमच्या सेवानिवृत्तीच्या निधीतून तुम्ही प्रत्येक वर्षी किती रक्कम काढली पाहिजे. ४%च्या नियमामुळे तुम्हाला तुमच्या सेवानिवृत्तीनंतरचा निधी कमी पडण्यापासून संरक्षण मिळते असे समजले जाते. हे साध्य करण्यासाठी तुम्ही तुमच्या वार्षिक खर्चाच्या २५ पट निधी साठवलाच पाहिजे. परंतु हा ४%चा नियम निवृत्तीवेतन आणि घरभाडे यांसारख्या पोर्टफोलिओत नसलेल्या उत्पन्नाच्या साधनांना हिशेबात घेत नाही. त्याव्यतिरिक्त, रूल ऑफ थंब हा नेमस्त गृहितकांचा वापर करतो. ज्या सेवानिवृत्तांना एकापेक्षा अधिक जोखमी घेणे अडचणीचे नसते, ते प्रत्येक वर्षी अधिक मोठी रक्कम सुरक्षितपणे काढून घेऊ शकतात.

## १०० वजा तुमचे वय हा नियम

या नियमामुळे तुम्हाला तुमचे असेट ॲलोकेशन ठरवण्यास मदत होते. या नियमानुसार, तुमचे वय जर ३० वर्षे असेल, तर तुमच्या पोर्टफोलिओपैकी ७०% इक्विटिज्साठी ॲलोकेट केले पाहिजेत. १०० वजा तुमचे वय ह्या नियमामुळे असेट ॲलोकेशन सोपे होत असले, तरी त्यात काही दोषही आहेत. हा नियम असे सांगतो की, अधिक तरुण गुंतवणूकदारांनी इक्विटिज्मध्ये अधिक गुंतवणूक केली पाहिजे आणि वाढत्या वयाबरोबर कमी धोके पत्करले पाहिजेत. यात समस्या अशी असते की, गुंतवणूकदाराची वैयक्तिक परिस्थिती आणि जोखमीचे प्रोफाइल विचारात घेतले जात नाहीत. उदाहरणार्थ, अधिक जबाबदाऱ्या आणि दायित्वे असलेला तरुण गुंतवणूकदार इक्विटिज्मध्ये मोठी रक्कम कदाचित गुंतवू शकणार नाही. त्याचप्रमाणे, सेवानिवृत्त व्यक्ती ह्या नियमात अपेक्षित असल्यापेक्षाही अधिक गुंतवणूक इक्विटिज्मध्ये करू शकेल.

त्याखेरीज, यात अल्प, मध्यम आणि दीर्घ कालक्षितिजांमध्ये प्राप्त करावयाची कालक्षितिजाची उद्दिष्टे विचारात घेतलेली नसतात. म्हणून असा पोर्टफोलिओ एकतर अधिक नेमस्त बनू शकतो किंवा तुम्हाला तुमच्या जोखीम पत्करण्याच्या क्षमतेच्या पलीकडे घेऊन जाऊ शकतो. ह्या नियमामध्ये तुम्ही तुमच्या पोर्टफोलिओचा समतोल अधिक वेळा साधण्याचीही गरज असते, जे वेगवेगळ्या उद्दिष्टांसाठीच्या कालक्षितिजांसाठी आवश्यक असू शकते.

## ५०-३०-२० चा नियम

हा नियम असे सांगतो की, तुमच्या उत्पन्नापैकी ५०% उत्पन्न तुमच्या गरजांसाठी (किराणासामान, भाडे, ईएमआय, इत्यादी) वापरले पाहिजे, ३०% तुम्हाला हव्या असलेल्या गोष्टींसाठी (मनोरंजन, सुट्टीतील आनंद, इत्यादी) आणि उर्वरित २०% बचत आणि गुंतवणुकीसाठी वापरले पाहिजे.

हा नियम सर्वसाधारणपणे वर्तमानात आणि भविष्यात तुम्हाला तडजोड करावी लागू नये अशा प्रकारे तुम्हाला तुमच्या गरजा, हव्या असलेल्या गोष्टी आणि बचतीसाठी स्रोतांचे ॲलोकेशन करण्याचे महत्व समजून घेण्यास मदत करीत असला, तरी तुम्ही तुमची वैयक्तिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यानुसार ॲलोकेशनवर पुन्हा एकदा विचार केला पाहिजे. अर्थात, नियमितपणे गुंतवणूक करण्याची सवय लावणे आणि ही रक्कम नियमितपणे वाढवीत जाणे यामुळे तुमच्या आर्थिक भवितव्यात फार मोठा फरक पडू शकतो.

सिक्युरिटी गुंतवणुकीप्रमाणेच म्युच्युल फंड, शेअर बजार आणि इतर धोक्यांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड

(CIN No.: U74140MH2003PTC142921)

मुख्य कार्यालय
अंधेरी : ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३. टेलिफोन : ६८२८ ८९४७.
इ-मेल : information@wiseinvest.co.in

शाखा
ठाणे : ५०२, पाचवा मजला, प्रतीभा बिल्डींग, तीन पेट्रोल पंप जवळ, पाचपाखाडी, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०२. टेलिफोन : २५३७ १५६७ / २५३९ १३०६.
इ-मेल : information1@wiseinvest.co.in

www.wiseinvest.co.in

जाहीर निवेदन : प्रकाशनाच्या वेळी यातील सर्व माहिती चुकीची व खोटी नाही याची खात्री केलेली असून, त्याच्या अचूकतेबद्दल व पूर्णत्वाबद्दल आम्ही कोणतेही प्रतिनिधत्व करत नाही. वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड ला जबाबदार न धरता सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे.

धोके : म्युच्युअल फंड, जसे की सिक्युरिटी इन्व्हेस्टमेन्ट हे शेअर बाजार व इतर धोक्यांवर अवलंबून असतात आणि योजनेची उद्दिष्टे साध्य होतीलच असे खात्रीलायक सांगता येत नाही. सिक्युरिटीजमधील इतर गुंतवणुकीप्रमाणेच युनिटचे एन ए व्हि (NAV) वर किंवा खाली जाऊ शकते व ते कॅपिटल मार्केटवर परिणाम करणाऱ्या घटकांवर व प्रभावांवर अवलंबून असते. कृपया, गुंतवणूक करण्यापूर्वी ऑफर डॉक्युमेन्ट वाचा.

श्री. हेमन्त कुमार रुस्तगी यांनी ६०२, सहावा मजला, श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स, न्यु लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ येथून, वाईजइन्व्हेस्ट प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासाठी संपादित, प्रकाशित केले आहे व ॲडव्हान्टएज ऑफसेट प्रिंटर्स, के-७ रिजवी पार्क, एस. व्ही. रोड, सांताक्रुझ (पश्चिम), मुंबई ४०००५४ येथे छापले आहे.

Edited, Published and Printed by Mr. Hemant Kumar Rustagi, on behalf of **Wiseinvest Pvt. Ltd.** (formerly known as **Wiseinvest Advisors Pvt. Ltd.**) from 602, 6th Floor, Sri Krishna Complex, Opp. Laxmi Ind. Estate, New Link Road, Andheri West, Mumbai 400053 at **AdvantEdge Offset Printers,** K-7 Rizvi Park, S V Road , Santacruz (W), Mumbai 400 054. Design by **Mosaic Design.** Copyright reserved © 2007. All rights reserved in favour of Wiseinvest Pvt. Ltd.